# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

ई-मेल-maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org


क्र.राज्य सीईटी कक्ष/नीट-युजी २०१८/रुइऑआयुमहावि-मायणी/२०१८/नोटीस क्र.३३/१४१८ दिनांक: १६/१०/२०१८

# सूचना

## नीट - युजी - २०१८

### रुरल इन्स्टिटयुट ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर, मायणी, सातारा या आयुर्वेद महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम प्रवेशाबाबत

रुरल इन्स्टिटयुट ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर, मायणी, सातारा या महाविद्यालयास केंद्रशासनाचे आयुष मंत्रालयाने पत्र क्र.R-१२०११/२९ /२००३/EP(IM-१), दि.१४-१०-२०१६ अन्वये सन २०१६-१७ ते २०२०-२१ या एकूण पाच वर्षासाठी प्रति वर्षी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता प्रदान केली होती. तसेच, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर महाविद्यालयास ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता संलग्नीकरण प्रदान केले आहे.

वरीलप्रमाणे मान्यता विचारात घेऊन दि.१८-९-२०१८ रोजी व त्यानंतरच्या प्रवेशफेरीमध्ये सदर महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाकरिता उमेदवारांचे गुणानुक्रम व पसंतीक्रमानुसार निवड करण्यात आली होती.

तथापि, आता, केंद्रशासनाचे आयुष मंत्रालयाने त्यांचे संकेतस्थळावर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विद्यार्थी प्रवेश करण्यास मान्यता नाकारलेल्या महाविद्यालयांची यादी दि.११-१०-२०१८ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर यादीमध्ये रुरल इन्स्टिटयुट ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर, मायणी, सातारा या महाविद्यालयाचा समावेश आहे. यास्तव, दि.१७-१०-२०१८ रोजी होणा-या प्रवेशफेरी मध्ये सदर महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश होणार नाहीत.

उपरोक्त वस्तुस्थितीची संबंधित सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-
(ए.इ.रायते) भाप्रसे
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.